266/624

Friday,January 22 ,2021

4:09 PM

पावती

Original/Duplicate

नोंदणी क्रं. :39म

Regn.:39M

सह दुय्यम निबंधक, वर्ग-२

नागपूर शहर क्र. 3.

पावती क्र.: 1034 दिनांक: 22/01/2021

गावाचे नाव: जैताला

दस्तऐवजाचा अनुक्रमांक: नगन3-624-2021

दस्तऐवजाचा प्रकार : विकसनकरारनामा

सादर करणाऱ्याचे नाव: मे. श्री इन्फ्राटेक (भागीदारी संस्था) तर्फे भागीदार विनय पंढरिकराव संभे

सह दुय्यम निबंधक, वर्ग-२.
नागपूर शहर क्र. 3.

नोंदणी फी	रु. 30000.00
दस्त हाताळणी फी	रु. 520.00
पृष्ठांची संख्या: 26	
एकूण:	रु. 30520.00

DELIVERED

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ अंदाजे
4:27 PM ह्या वेळेस मिळेल.

NGP3

सह दुय्यम निबंधक, वर्ग-२
नागपूर शहर क्र. 3.

बाजार मुल्य: रु.13211000 /-

मोबदला रु.12600000/-

भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 660600/-

1) देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.520/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 2201202109089 दिनांक: 22/01/2021
बँकेचे नाव व पत्ता:

2) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.30000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH010514672202021E दिनांक: 22/01/2021
बँकेचे नाव व पत्ता:

CHALLAN

MTR Form Number-6

GRN MH010514672202021E	**BARCODE**	**Date** 22/01/2021-14:15:03	**Form ID** 25.2

Department	Inspector General Of Registration	**Payer Details**	
Type of Payment	Stamp Duty Registration Fee	**TAX ID / TAN (If Any)**	
		PAN No.(If Applicable)	APZPS8140M
Office Name	NGP3_JT NAGPUR NO 3 SUB REGISTRAR	**Full Name**	Ms Shree Infratech through Vinay P Sambhe and others
Location	NAGPUR		
Year	2020-2021 One Time	**Flat/Block No.**	CTS No. 19, Plot No. 19
Account Head Details	**Amount In Rs.**	**Premises/Building**	
0030046401 Stamp Duty	660600.00	**Road/Street**	Mouza - Jaitala
0030063301 Registration Fee	30000.00	**Area/Locality**	Nagpur
		Town/City/District	
		PIN	4 4 0 0 1 6
		Remarks (If Any)	PAN2=AFUPS0545M~SecondPartyName=Jayshree D Sakharkar~
Total	6,90,600.00	**Amount In Words**	Six Lakh Ninety Thousand Six Hundred Rupees Only

Payment Details	BANK OF INDIA	**FOR USE IN RECEIVING BANK**			
Cheque-DD Details		Bank CIN	Ref. No.	02202292021012205794	108709511
Cheque/DD No.		Bank Date	RBI Date	22/01/2021-14:15:03	Not Verified with RBI
Name of Bank		Bank-Branch		BANK OF INDIA	
Name of Branch		Scroll No. , Date		Not Verified with Scroll	

Department ID : Mobile No. : 8390736509

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.

सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तांसाठी लागू आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागू नाही.

नागपूर - ३
६२४ / २०२१
9 / 22
Page 1/1

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR, CLASS & NAGPUR CITY NO.3

Print Date 22-01-2021 02:15:53

Department of Stamp & Registration, Maharashtra			
Receipt of Document Handling Charges			
PRN	2201202109089	**Date**	22/01/2021
Received from mae. shri infratek (bhagidari sanstha) tarfe bhagidar vinay pundlikrao sambhe . ., Mobile number 8390736509, an amount of Rs.520/-, towards Document Handling Charges for the Document to be registered(iSARITA) in the Sub Registrar office Joint S.R. Nagpur 3 of the District Nagpur.			
Payment Details			
Bank Name	BKID	**Date**	22/01/2021
Bank CIN	10004152021012208226	**REF No.**	108710447
This is computer generated receipt, hence no signature is required.			

नागपूर - ३
६२४ / २०२१
२ / २६

लिहून घेणार : **मे. श्री इन्फ्राटेक**

(पक्ष क्र. १) **(भागीदारी संस्था)**

कार्यालय - ५६, लाईफ स्टाईल अपार्टमेंट,
नागोबा मंदिर रोड, लोकसेवा नगर, भामटी,
नागपूर - ४४० ०२२.

तर्फे भागीदार -

१) **श्री. विनय पुंडलिकराव संभे**
वय अं. ४८ वर्षे, व्यवसाय - शेती व व्यापार
राह. १०१, लाईफ स्टाईल अपार्टमेंट, ५६, नागोबा मंदिर रोड, लोकसेवा नगर, भामटी, नागपूर - ४४० ०२२.
(स्थायी लेखा संख्या - APZPS 8140 M)
(आधार क्रमांक - 8183 2629 4565)
(भ्रमणध्वनी क्र. 83 907 36509)

२) **श्री. प्रविण चंद्रकांत हिंगे**
वय अं. ३४ वर्षे, व्यवसाय - शेती व व्यापार
राह. ६१२, दर्शन कॉलोनी, मेन रोड, नंदनवन,
नागपूर - ४४० ००९.
(स्थायी लेखा संख्या - ADEPH 4619 P)
(आधार क्रमांक - 9556 1870 0692)
(भ्रमणध्वनी क्र. 97 661 18765)

३) **श्री. चक्रधर ज्ञानेश्वर भोयर**
वय अं. ३८ वर्षे, व्यवसाय - शेती व व्यापार
राह. ५०, सनमार्ग नगर, हूडकेश्वर रोड,
नागपूर - ४४० ०३४.
(स्थायी लेखा संख्या - APNPB 3401 N)
(आधार क्रमांक - 7622 1317 4420)
(भ्रमणध्वनी क्र. 97 657 00134)

यापुढे लिहून घेणार यांना **'पक्ष क्र.१'** म्हणुन संबोधण्यात येईल.

STAMPS AFFIXED HERE :

नगन - ३
६२४ / २०२१
४ / २६

OFFICE OF THE JOINT SUB-REGISTRAR, CLASS II, NAGPUR CITY NO. 3

मुद्रांक शुल्क ₹ ६,६०,६००/-
नोंदणी शुल्क ₹ ३०,०००/-

विकासाचा करारनामा

करारनामा किंमत ₹ १,२६,००,०००/-

बाजारभाव किंमत ₹ १,३२,११,०००/-

खुली जमीन दर ₹ २६,०००/- प्रति चौ.मी.
सदनिका दर ₹ ४१,७१०/- प्रति चौ.मी.
विभाग क्र. ३०.४३१/१३(१८८क), पृष्ठ क्र. ७२४.

(तसेच, दस्तात नमुद भुखंडाचे बाजारभाव मुल्य हे ₹ २६,०००/- प्रति चौ.मी. × भुखंडाचे क्षेत्र ३९०.१२ चौ.मी. = ₹ १,०१,४३,१२०/- व भुखंडमालक यांना मिळणाऱ्या सदनिकेचे मुल्य हे बांधकाम दर ₹ २६,६२०/- प्रति चौ.मी. × मिळणारे बांधीव क्षेत्र ११५.१९ चौ.मी. = ₹ ३०,६६,३५८/- बांधीव क्षेत्राचे मुल्यांकन, असे एकुण बाजारभाव मुल्य सरासरी ₹ १,३२,११,०००/- निश्चीत करण्यात आलेले आहे.)

STAMPS AFFIXED HERE :

नगन - ३
१४ / २०२१
२ / २६

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR, CLASS-II, NAGPUR CITY NO. 3

लिहून देणार (पक्ष क्र. २)	:	**सौ. जयश्री धनंजय साखरकर** वय अं. ५७ वर्षे, व्यवसाय - व्यापार राह. ५२, डब्ल्युएचसी रोड, लक्ष्मी नगर, नागपूर - ४४० ०२२. (स्थाई लेखा संख्या - AFUPS 0545 M) (आधार क्रमांक - 3428 6874 2544) (भ्रमणध्वनी क्र. - 98 237 23718)

यापुढे लिहून देणार यांना **'पक्ष क्र.२'** म्हणुन संबोधण्यात येईल.

(या पूढील लेखात लिहून घेणार (पक्ष क्र. १) व लिहून देणार (पक्ष क्र. २) या अर्थाच्या शब्दात पूर्व संदर्भ विरुद्ध नसल्यास त्यांचे प्रत्येकी वारस, वहिवाटदार, कायदेशीर हक्कदार, आममुखत्यार धारक/धारणा, इस्टेटीचे प्रतिपालक, भागीदारी संस्थेचे ईतर भागीदार किंवा ज्यांना या इस्टेटीपासून फायदा मिळेल असे सर्व अंतर्भूत समजण्यांत येतील. तसेच, या पुढील संदर्भात ज्या ठिकाणी एक वचनी उलेख येईल, त्या ठिकाणी अनेक वचनी अथवा उलटपक्षी ज्या ठिकाणी अनेक वचनी शब्दार्थात एक वचनी अध्याहत समजण्यात येईल).

आज दिनांक **२२/०१/२०२१** रोजी हा विकासाचा करारनामा लिहून देण्यात येत आहे कि, पक्ष क्र. २ यांच्या एकमेव मालकी, कब्जात, वापरी व वहिवाटीतील त्यांच्या नांवे शासकीय, निमशासकीय अभिलेखावर दर्ज असलेली खालील वर्णनीत स्थावर मालमत्ता ही पक्ष क्र. २ यांची स्वअर्जीत असुन सदर मालमत्तेवर पक्ष क्र. २ यांच्याशिवाय अन्य कुणाचाही कुठल्याही प्रकारचा हक्क व संबंध नाही म्हणून पक्ष क्र. २ यांना सदर्हू मालमत्ता विकण्याचा, विकसीत करण्याचा, करार करण्याचा पुर्णपणे कायदेशिर अधिकार आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

नागपूर महानगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यासच्या सिमेअंतर्गत येणारा खास **मौजा - जयताळा**, प.ह.क्र. ४४, **शिट क्र. १८८-क, नगर भुमापन क्र. १९, म्यु. कार्पोरेशन घर क्र. ५०३/१९,** वार्ड क्र. ७४, जनहित गृहनिर्माण सहकारी संस्था, राजेंद्र नगर लेआऊट, नागपूर, तह. व जि. नागपूर येथील **अकृषक खसरा क्र. १४/२** मध्ये आखलेल्या अभिन्यासातील **भुखंड क्र. १९,** ज्याची लांबी उत्तर-दक्षिण ७० फुट (२१.३३ मी.) व रुंदी पुर्व-पश्चिम ६० फुट (१८.२९ मी.) असुन असे या भुखंडाचे एकुण जागेचे **क्षेत्रफळ ४२०० चौ.फुट (३९०.१२ चौ.मी.)** आहे.

STAMPS AFFIXED HERE :

नागपूर – ३
६२१ / २०२१
५ / २६

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR, CLASS II, NAGPUR CITY NO. 3

यासह या भुखंडाची चर्तु:सिमा येणेप्रमाणे :-

पुर्वेस : भुखंड क्र. १८

पश्चिमेस : भुखंड क्र. २०

उत्तरेस : भुखंड क्र. ५

दक्षिणेस : ९ मी. रुंदीचा अभिन्यास रोड

हिस्सापुर्ण.

स्थावर मालमत्तेचा पुर्व इतिहास

उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्ता ही अगोदर श्रीमती सुचिता उर्फ वर्षा दिलीपराव वारजुरकर यांनी श्री. अण्णा यशवंतराव घोरपडे, श्री. प्रेमलाल मोहनलाल हिरनवार तर्फे आममुखत्यारधारक – श्री. रविंद्र यशवंतराव बन्सोड (मानद सचिव जनहित गृहनिर्माण संस्था, नागपूर) यांचेकडून दि. ३१/०३/१९८९ रोजी पंजीबद्ध विक्रीपत्रान्वये खरेदी केली असून सदर दस्त हा मा. सह दुय्यम निबंधक, नागपूर क्र. १ यांचे समक्ष जादा १ नंबर बुकाचे १३०९ व्हॉल्युमचे १७० ते १७४ पृष्ठाचे ४७२४ (छा) नंबरी नोंदल्या गेले आहे.

तद्पश्चात, उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्ता ही पक्ष क्र. २ यांनी श्रीमती सुचिता उर्फ वर्षा दिलीपराव वारजुरकर यांचेकडून दिनांक ०५/११/२००१ रोजी पंजीबद्ध विक्रीपत्रान्वये खरेदी केली असून सदर दस्त हा मा. सह दुय्यम निबंधक, नागपूर क्र. ९ यांचे समक्ष १ नंबर बुकाचे १५८५/२००१ नंबरी नोंदल्या गेले आहे.

तेंव्हापासून, उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्ता हि पक्ष क्र.२ यांच्या एकमेव मालकी, कब्जात, वापरी व वहिवाटीत असुन सदर्हू मालमत्तेचा विकासाचा करारनामा पक्ष क्र. १ यांच्या पक्षात करण्याचा पक्ष क्र.२ यांना पूर्णपणे कायदेशीर अधिकार आहे.

STAMPS AFFIXED HERE :

नागपूर – ३
६२४ / २०२१
९ / २९

तसेच, उपरोक्त वर्णनीत खसरा हा मा. सब डिव्हीजनल ऑफिसर, नागपूर यांनी दिनांक १५/१२/१९६५ रोजी रा.मा.क्र. २५६/ए-२/१९६३-६४ अन्वये पारित केलेल्या आदेशान्वये गैरकृषी उपयोगाकरीता अकृषक घोषित करण्यात आलेला आहे.

तसेच, पक्ष क्र. २ यांनी असे ठरविले कि, उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्तेवर मंजुर नकाशा प्रमाणे बहुमजली ईमारतीचे बांधकाम करावे व त्यापैकी एक सदनिका स्वत:जवळ ठेऊन उर्वरित सदनिका ईच्छुक खरेदीदार यांना नेहमी व वंशपरंपरेकरीता विकावी, परंतू पक्ष क्र. २ यांना बांधकामाचा अनुभव नसल्यामुळे पक्ष क्र. २ यांनी पक्ष क्र. १ यांच्यासमक्ष प्रस्ताव मांडला व उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्ता पक्ष क्र. २ यांच्या म्हणण्यानुसार पक्ष क्र. १ यांनी विकसीत करण्याचे ठरविले.

उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्ता विकसीत करण्याकरीता पक्ष क्र. १ हे पक्ष क्र. २ यांना ठरल्याप्रमाणे भुखंडाचा मोबदला म्हणून रक्कम ₹ **७२,६८,०००/- (अक्षरी रुपये बहात्तर लक्ष अडुसष्ठ हजार फक्त)** देतील तसेच, सदर रक्कम ही आज रोजीपासून पुढे ९ महिण्याच्या मुदतीमध्ये खालीलप्रमाणे देण्या-घेण्याचे ठरले, ते येणेप्रमाणे :-

₹ १३,५०,०००/- (अक्षरी रुपये तेरा लक्ष पन्नास हजार फक्त) आज रोजी सदर विकासाचा करारनामा पंजीबद्ध करतेवेळी पक्ष क्र. १ यांचेकडून भारतीय स्टेट बँक, शाखा - उदय नगर, नागपूर चा धनादेश क्र. ८०४२१९, दिनांक २२/०१/२०२१ रोजीचा पक्ष क्र. २ यांच्या नांवाचा प्राप्त झाला असून सदर रकमेचा धनादेश प्राप्त झाल्याचे पक्ष क्र. २ यांना कबुल व मंजुर आहे.

₹ १३,५०,०००/- (अक्षरी रुपये तेरा लक्ष पन्नास हजार फक्त) आज रोजीपासून पुढे २ महिण्याच्या मुदतीमध्ये धनादेश द्वारे देण्या-घेण्याचे ठरले असून ते पक्ष क्र. २ यांना कबुल व मंजुर आहे.

STAMPS AFFIXED HERE :

नगन – ३
६२४ / २०२१
७ / २६

₹ १८,००,०००/- (अक्षरी रुपये अठरा लक्ष फक्त) आज रोजीपासून पुढे ५ महिण्याच्या मुदतीमध्ये धनादेश द्वारे देण्या-घेण्याचे ठरले असून ते पक्ष क्र. २ यांना कबुल व मंजुर आहे.

₹ २०,४१,२००/- (अक्षरी रुपये वीस लक्ष एक्केचाळीस हजार दोनशे फक्त) आज रोजीपासून पुढे ९ महिण्याच्या मुदतीमध्ये धनादेश द्वारे देण्या-घेण्याचे ठरले असून ते पक्ष क्र. २ यांना कबुल व मंजुर आहे.

₹ ७,२६,८००/- (अक्षरी रुपये सात लक्ष सव्वीस हजार आठशे फक्त) सदर रक्कम आयकर विभागाद्वारे निर्देशीत केलेल्या सुचनेनुसार टीडीएसच्या रक्कमेचा भरणा करण्याकरीता सुरक्षित ठेवण्यात आलेली आहे.

₹ ७२,६८,०००/- (अक्षरी रुपये बहात्तर लक्ष अडुसष्ठ हजार फक्त) असे एकुण.

त्याचप्रमाणे, या भुखंडाच्या मोबदला रक्कम रु. ७२,६८,०००/- व्यतिरिक्त या उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्तेवर पक्ष क्र. १ यांच्याद्वारे संबंधीत विभागाकडून मंजुर केलेल्या नकाशाप्रमाणे भविष्यात बांधण्यात येणाऱ्या बहुमजली ईमारतीमधील आजच्या बाजारभाव (सन २०२०-२१ चे मुल्यांकन दर) प्रमाणे किंमत **रुपये ४१,७१०/- प्रति चौ.मी.** प्रमाणे रक्कम **₹ ४८,०६,०००/-** व **पक्ष क्र. १ व २ यांनी आपसी सहमतीने निश्चीत केलेली किंमत ₹ ५३,३२,०००/- (अक्षरी रुपये त्रेपन लक्ष बत्तीस हजार फक्त)** किंमतीची अंदाजे **११५.१९ चौ.मी. (१२४० चौ.फुट)** बांधीव क्षेत्र ची **१ (एक) पहिल्या माळ्यावरील ईस्टर्न साईड विथ अलॉटेड कार पार्कींग सदनिका** (३-बीएचके) पक्ष क्र. २ यांना नेहमी व वंशपरंपरेकरीता देतील, असे मोबदला किंमत **₹ ७२,६८,०००/-** भुखंडाचा मोबदला व **₹ ५३,३२,०००/-** च्या किंमतीची १ सदनिका असे एकुण **₹ १,२६,००,०००/-** मोबदला रुपात पक्ष क्र. १ हे पक्ष क्र. २ यांना देतील.

STAMPS AFFIXED HERE :

नगन – ३
६२४ / २०२१
८ / २६

उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्तेचा विकासाचा करारनामा पक्ष क्र. १ व पक्ष क्र. २ यांच्या मध्ये खालील अटी व शर्ती मध्ये करण्यात येत आहे ते येणेप्रमाणे :-

१) पक्ष क्र. १ हे नागपूर सुधार प्रन्यास / नागपूर महानगर पालिका यांनी मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्ते वर बांधकाम करतील व बांधकाम करीत असतांना नागपूर सुधार प्रन्यास / नागपूर महानगर पालिका यांच्या नियमावलीचे पालन करतील.

२) उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्तेचा नकाशा मंजूर करण्याकरीता येणारा खर्च हा पक्ष क्र. १ हे करतील.

३) उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्तेवर करण्यात येणारे बांधकाम हे पक्ष क्र. १ यांनी नेमलेले ठेकेदार / कॉन्ट्रक्टर / पेटी कॉन्ट्रक्टर यांच्या मार्फत केल्या जाईल त्याकरीता पक्ष क्र. २ यांचा कसल्याही प्रकारचा आक्षेप व उजर राहणार नाही.

४) उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्तेवर मंजूर नकाशा प्रमाणे बांधण्यात येणाऱ्या बहुमजली इमारती मधील १ (एक) स्वतंत्र सदनिका ज्याचे अंदाजे बांधीव क्षेत्रफळ ११५.१९ चौ.मी. (१२४० चौ.फुट) चे पक्ष क्र. १ हे पक्ष क्र. २ यांच्या किंवा पक्ष क्र. २ सुचवतील त्या व्यक्तीच्या पक्षात बिना उजर 'डीड ऑफ अपार्टमेंट' हा दस्त पंजीबद्ध करुन हस्तांतरीत करुन देतील तसेच सदर १ (एक) सदनिका सोडून इतर सदनिका/ गाळे/दुकान हे पक्ष क्र. १ ईच्छुक खरेदीदारास विकु शकतात तसेच ईच्छुक खरेदीदारास बयाना पत्र, विक्रीचा करारनामा, हस्तांतरण पत्र, दुरुस्ती पत्र, घोषणा पत्र व इतर दस्तावेज पंजीकृत करुन देण्याचे संपूर्ण अधिकार हे पक्ष क्र.१ यांना राहील. तसेच इच्छुक खरेदीदाराकडुन बुकींग राशी व खरेदीदारास विकलेल्या सदनिका/ गाळे/दुकान यांची संपूर्ण राशी स्विकारण्याचा अधिकार हे पक्ष क्र.१ यांना राहील.

STAMPS AFFIXED HERE :

नगर - ३
६२४ / २०२१
९ / २९

५) सदर्हू मालमत्तेचा नकाशा मंजूर झाल्यानंतर व तसेच इमारत परवाना (बिल्डींग परमिट) प्राप्त झाल्यावर पक्ष क्र. १ व पक्ष क्र. २ हे सदर्हू मालमत्तेचे दि महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप ॲक्ट, १९७० नुसार घोषणा पत्र पंजीबद्ध करतील.

६) सदर मालमत्तेचे पक्ष क्र.२ यांनी पक्ष क्र. १ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणालाही विक्री, हस्तांतरण (ट्रान्सफर) वगैरे केलेले नाही व कोणास लेखी किंवा तोंडी करार, सौदा वगैरे केलेला नाही. सदर मालमत्तेवर कोणतेही गोत्रपुरुष वारसानांचा हक्क संबंध नाही. असे निघाल्यास किंवा कोणी दावे उजर पेश केल्यास याची सर्वस्वी जवाबदारी ही पक्ष क्र.२ यांची राहील व त्यामुळे पक्ष क्र. १ यांचे काही नुकसान झाल्यास पक्ष क्र.२ हे आपल्या इतर चल-अचल सम्पत्तीतुन झालेल्या नुकसानाची भरपाई पक्ष क्र. १ यांना स्वखर्चाने करुन देतील.

७) उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्तेवर येणारा आजपर्यंतचा नागपूर महानगर पालिकेचा कर, ना.सु.प्र. चे भु-भाटक कर व इतर कर पक्ष क्र.२ यांनी स्वखर्चाने भरलेले असुन यापुढे येणारे कर पक्ष क्र. १ हे स्वखर्चाने पटवतील.

८) पक्ष क्र.२ हे सदनिका/गाळे/दुकान धारकांचे नांव नागपूर महानगर पालिका, नागपूर सुधार प्रन्यास, नगर भुमापन अधिकारी कार्यालय व इतर शासकीय व निमशासकीय अभिलेखावर मालक या नात्याने दर्ज करण्याकरीता सहकार्य करतील.

९) उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्तेवर बांधण्यात येणाऱ्या सदनिका/ गाळे/दुकान हे पक्ष क्र. १ यांनी कोणालाही हस्तांतरीत केल्यास पक्ष क्र.२ यांची कोणतीच हरकत राहणार नाही. पक्ष क्र. १ म्हणेल त्या नांवाने किंवा संस्थेच्या नांवाने पक्ष क्र.२ हे सदर्हू सदनिका/गाळे/दुकान चे पंजीकृत (रजिष्टर्ड) विक्रीचा करारनामा व विक्रीपत्र करुन देतील, यास उजर करणार नाही.

STAMPS AFFIXED HERE :

नागपूर-३
६२४ / २०२५
१० / २६

१०) तसेच उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्तेचे पक्ष क्र. १ यांना यापुढे मालकी, वापरी वहिवाट किंवा इतर बाबीसंबंधी हक्क प्राप्त होण्याकरीता पक्ष क्र.२ यांचे एखादे लेखाची आवश्यकता भासली तर ते पक्ष क्र. २ हे पक्ष क्र. १ यांच्या खर्चाने लिहुन देतील व आवश्यकतेनुसार पंजीकृत (रजिस्टर्ड) करुन देतील. त्याकरीता पक्ष क्र.२ हे कोणत्याही प्रकारचा उजर पेश करणार नाही तसेच कोणत्याही प्रकारचा जास्तीचा मोबदला मागणार नाही.

११) उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्ते मध्ये कोणत्याही प्रकारची क्षेत्र दुरुस्ती झाल्यास त्यावर पक्ष क्र.१ व २ यांचा हक्क राहील.

१२) तसेच, पक्ष क्र.२ यांनी सदर्हू मालमत्तेचा ताबा पक्ष क्र.१ यांना फक्त विकास व बहुमजली ईमारतीचे बांधकाम करण्याकरीता दिलेला आहे, तसेच, पक्ष क्र. १ यांनी पक्ष क्र. २ यांना दिलेले संपुर्ण धनादेशाप्रमाणे मोबदला रक्कम मिळाल्यानंतर, पक्ष क्र. २ हे पक्ष क्र. १ यांना ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी चे कलम ५३ (ए) प्रमाणे ताबा देतील तो पर्यंत सर्व हक्क पक्ष क्र. २ यांच्याकडे राहील, सदर्हू मालमत्तेचे संपूर्ण मुळ दस्तावेज हे पक्ष क्र. १ यांच्या स्वाधीन केले आहेत व ते त्यांनी स्विकारलेले आहे.

१३) तसेच, सदर दस्तात काही त्रुटी (चुका) आढळल्यास त्याचे दुरुस्ती पत्र करण्यास पक्ष क्र. २ हे पक्ष क्र. १ यांना सर्वतोपरी मदत करतील, टाळाटाळ करणार नाही. जर काही कारणास्तव पक्ष क्र. २ हे व्यक्तिगतरित्या मा.दुय्यम निबंधक, नागपूर यांचे समक्ष हजर न झाल्यास पक्ष क्र. १ हे उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्तेचे एकतर्फी दुरुस्ती पत्र/घोषणा पत्र करण्यास मोकळे राहतील, त्यास पक्ष क्र.२ यांची कुठल्याही प्रकारची काहीही हरकत राहणार नाही.

१४) तसेच, पक्ष क्र. १ हे उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्ता ही विकसीत करुन पक्ष क्र. २ यांना भविष्यात बांधकाम करुन देण्यात येणारी १ (एक) स्वतंत्र सदनिका सोडून इतर सदनिका/गाळे/दुकान व इतर ईच्छुक खरेदीदारास अविभक्त हिश्यासह पंजीबद्ध विक्रीपत्रान्वये नेहमी व वंशपरंपरेकरीता विकु शकतील त्याकरीता पक्ष क्र. २ यांची खुली सहमती आहे, अशी पक्ष क्र. २ हे पक्ष क्र. १ यांना हमी देत आहे.

STAMPS AFFIXED HERE :

नगत – ३
६२४ / २०२१
११ / २६

१५) तसेच, पक्ष क्र. १ हे सदर्हू मालमत्तेमध्ये विद्युत मिटर, पाणी मिटर हे स्वत:च्या नांवे किंवा इतर सदनिका/गाळे/दुकान धारक यांच्या नांवे घेऊ शकतील त्याकरीता पक्ष क्र. २ यांची खुली संमती आहे.

१६) तसेच, उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्तेवर बांधण्यात येणाऱ्या बहुमजली इमारतीचे नांव पक्ष क्र. १ हे ठरवतील.

१७) तसेच, उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्तेचा भविष्यात वाढलेला एफ.एस.आय. यावर सुद्धा पक्ष क्र. १ यांचा संपूर्ण अधिकार राहील व हे पक्ष क्र. २ यांना कबुल व मंजुर आहे. तसेच पक्ष क्र. १ हे सदर्हू मालमत्ता विकसीत व बांधकाम करतेवेळी टि.डी.आर. वापरु शकतात अशी पक्ष क्र. २ हे हमी देत आहे, त्याकरीता लागणारा संपुर्ण खर्च पक्ष क्र. १ हे स्वत: करतील.

१८) तसेच, उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्तेवर आजपासुन येणारे संपूर्ण कर, टॅक्स, सर्व्हिस टॅक्स, व्हॅट, जी.एस.टी. व इतर टॅक्स भरण्याची संपूर्ण जवाबदारी हि पक्ष क्र. १ यांची राहील.

१९) तसेच, पक्ष क्र. १ यांनी या उपरोक्त वर्णनीत भुखंडाचा संपुर्ण मोबदला किंमत रु. ७२,६८,०००/- पक्ष क्र. २ यांना दिल्यानंतर पक्ष क्र. १ हे उपरोक्त वर्णनीत भुखंडावर बांधण्यात येणाऱ्या सदनिका ईच्छुक खरेदीदार यांना विकु शकतील, विक्रीपत्र पंजीबद्ध करुन देऊ शकतील तसेच, उपरोक्त वर्णनीत स्थावर मालमत्तेवर पक्ष क्र. १ किंवा सदनिकाधारक हे कुठल्याही शासकीय बँकेकडुन, सहकारी संस्थेकडुन किंवा फायनांशियल इन्स्टीट्युशन कडुन सदर्हू मालमत्ता किंवा सदर्हू मालमत्तेचा अविभक्त हिस्सा गहाण ठेवून कर्ज घेऊ शकतात त्याकरीता पक्ष क्र.२ यांची खुली सहमती आहे. परंतु कर्जाच्या संपूर्ण रकमेची परतफेड करण्याची जवाबदारी हि पक्ष क्र. १ किंवा सदनिकाधारक यांची राहील, त्याकरीता पक्ष क्र. २ हे जवाबदार राहणार नाही.

STAMPS AFFIXED HERE :

